Volume: 1 Issue: 16 Pages: 81-82

International Journal of Research in Academic World

E-ISSN: 2583-1615
Impact Factor: 4.714

Received: 12/November/2022 Int. J Res. Acad. World. 2022; 1(16):81-82 Accepted: 16/December/2022

# “शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन या विषयातील उपपत्तीच्या अध्यापनासाठी अग्रत संघटक प्रतिमानाची परिणामकारकता अभ्यासने: एक अभ्यास”

*[1]प्रा. प्रताप भाऊसाहेब आत्रे

*[1]Assistant Professor, Department of Education, MVP Samajs College of Education Nashik, Savitribai Phule University Pune, Maharashtra, India.

**सारांश**

शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयातील अभ्यासक्रमामध्ये शालेय व्यवस्थापन महत्वाचा विषय आहे. त्यामध्ये अनेक व्यवस्थापनाच्या उपपत्तीचा समावेश केलेला आहे. या उपपत्तींचे आकलन पाठांतर करून करता येत नाही.त्यासाठी अग्रत संघटक प्रतीमानाचा वापर केला तर विद्यार्थी-शिक्षकांचे शालेय व्यवस्थापन उपपत्तीचे आकलन चांगले होते. म्हणून अध्यापनाची प्रतिमाने हि शालेय व्यवस्थापनाच्या अध्ययनासाठी उपयुक्त ठरतात

**मूल शब्द:** शिक्षक-प्रशिक्षण विद्यालय,शालेय व्यवस्थापन, वर्ग व्यवस्थापन, अग्रत संघटक प्रतिमान, उद्दिष्ट्निष्ठ व्यवस्थापन

## 1.1 प्रास्ताविक

शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयातील अभ्यासक्रमामध्ये शालेय व्यवस्थापन हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी पदवीधर किंवा पदव्युत्तर असतात. हे विद्यार्थी कला,विज्ञान किंवा वाणिज्य अशा विविध शाखातून आलेले असल्याने त्यांचा शालेय व्यवस्थापन या विषयाशी फारसा संबंध नसतो. त्यामुळे या विषयाचा अभ्यास करताना त्यांना अनेक समस्या भेडसावतात या समस्यांचे स्वरूप खालीलप्रमाणे.

शिक्षक प्रशिक्षणात शालेय व्यवस्थापन करत असताना कोण कोणत्या पद्धतीने करणे आवश्यक असते,त्यासाठी कोणकोणत्या सिद्धांताचा आधार घ्यावा लागतो,शालेय व्यवस्थापन सिद्धांताची तत्वे कोणती आहेत,त्या तत्त्वांचा वापर व्यवस्थापन करताना कशा पद्धतीने करावा, त्या तत्त्वांचा वापर केल्यानंतर चांगल्या प्रकारे व्यवस्थापन कशा पद्धतीने करता येईल त्या सगळ्या गोष्टींचा विचार हा शालेय व्यवस्थापन मध्ये केला जातो. शिक्षक म्हणून प्रभावी वर्ग व्यवस्थापन,प्रभावी वेळेचे व्यवस्थापन त्याचबरोबर शाळेमध्ये असणारे विविध उपक्रम असतात त्या उपक्रमांचे व्यवस्थापन ही शिक्षकाची जबाबदारी असते.आणि म्हणून प्रभावी व परिणामकारक व्यवस्थापन होण्यासाठी या अभ्यासक्रमात व्यवस्थापनाच्या वेगवेगळ्या उपपत्ती सिद्धांत हे दिलेले आहेत हे सिद्धांतांचा अध्ययन करत असताना विद्यार्थी हे सिद्धांत पाठ करण्याचा प्रयत्न करतात परंतु परीक्षेच्या वेळेस हे सिद्धांत सहज विद्यार्थ्यांना आठवत नाही आणि सहाजिकच त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये कमी गुण मिळतात

## 1.2 समस्या विधान

“शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन या विषयातील व्यवस्थापनाच्या उपपत्ती या घटकाच्या अध्यापनासाठी अग्रत संघटक प्रतिमांची परिणामकारकता अभ्यासणे: एक अभ्यास”

## 1.3 संशोधनाची उद्दिष्टे

1. शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात विद्यार्थ्यांना व्यवस्थापनाच्या उपपत्ती अभ्यासताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
2. विद्यार्थी विद्यार्थी शिक्षकांना व्यवस्थापनाच्या पद्धतीचे आकलन न होण्यामागील कारणांचा शोध घेणे.
3. विद्यार्थी शिक्षकांच्या शालेय व्यवस्थापन या विषयातील व्यवस्थापनाच्या उपपत्ती अध्यापनासाठी अग्रत संघटक प्रतिमानाची परिणामकारकता अभ्यासणे.
4. विद्यार्थी शिक्षकांना शालेय व्यवस्थापनाच्या सिद्धांताचे आकलन होण्यासाठी कृती कार्यक्रमांचे आयोजन करणे
5. विद्यार्थी शिक्षकांना व्यवस्थापनाच्या उपपत्तीचे आकलन होण्यासाठी तयार केलेल्या कृती कार्यक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.

## 1.4 संशोधनाची परिकल्पना

विद्यार्थी शिक्षकांना व्यवस्थापनाच्या उपपत्ती या घटकाचे अध्यापन करताना अग्रत संघटक प्रतिमानाचा वापर केल्यास त्यांच्यामध्ये धनात्मक वृद्धि दिसून येते.

## 1.5 संशोधनाची कार्यपद्धती

प्रस्तुत संशोधनात संशोधन संशोधकाने संशोधनासाठी प्रायोगिक व सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला त्यासाठी एक गट अभिकल्प ची निवड केली. सदर संशोधनासाठी संशोधकाने प्रासंगिक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला या पद्धतीमध्ये संशोधनासाठी सहज उपलब्ध होऊ शकणाऱ्या गटाची निवड केली जाते. संशोधनासाठी संशोधकाने नाशिक जिल्ह्यातील मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या ॲड.विठ्ठलराव गणपतराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या 50 विद्यार्थ्यांची निवड केली



*Corresponding Author: प्रा. प्रताप भाऊसाहेब आत्रे

### 1.6 संशोधनाची साधने

#### 1. प्रश्नावली

संशोधकाने नाशिक जिल्ह्यातील 11 शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयातील एकूण 50 प्राध्यापकांना प्रश्नावली दिली व माहितीचे संकलन करून अर्थनिर्वचन केले त्याचप्रमाणे संशोधकाने नाशिक जिल्ह्यातील मराठा विद्या प्रसारक समाजाच्या ॲड.विठ्ठलराव गणपतराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील द्वितीय वर्षाच्या 50 विद्यार्थ्यांना प्रश्नावली देऊन त्यांना शालेय व्यवस्थापन विषयातील व्यवस्थापनाच्या उपपत्ती अभ्यासताना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या.

#### 2. पूर्वचाचणी

संशोधकाने संबंधित समस्येच्या संदर्भात विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी पूर्व चाचणी घेतली त्यामध्ये शालेय व्यवस्थापनाच्या उपपत्ती त्या उपपत्तीची मूलतत्त्वे या सिद्धांताचे शैक्षणिक महत्त्व यासंदर्भात एकूण 50 गुणांची चाचणी घेतली.

#### 3. अंतिम चाचणी

संशोधकाने कृती कार्यक्रम अंमलबजावणी केल्यानंतर 50 गुणांची अंतिम चाचणी घेतली या चाचणीमध्ये पूर्वचाचणीच्या धर्तीवरच प्रश्न विचारले होते

#### 4. संशोधनासाठी पूरक साधने

विद्यार्थ्यांची बोधात्मक संरचना बळकट होण्यासाठी व विद्यार्थ्यांचे अर्थपूर्ण अध्ययन होण्यासाठी अग्रत संघटक प्रतिमानाचा उपयोग केला. संशोधकाने शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमातील शालेय व्यवस्थापन या विषयातील व्यवस्थापन उपपत्ती पैकी हेन्री फेयोल, पीटर ड्रकर, एफ डब्ल्यू टेलर, एबत्न मेयो, डेविस किथ यांच्या व्यवस्थापनाच्या उपपत्तीचे अग्रत संघटक प्रतिमाच्या पायऱ्या लक्षात घेऊन अध्यापन साहित्य विकसित करण्यात आले. प्रतिमान व त्यावर आधारित संशोधन कार्य लेखन व प्रत्यक्ष अध्यापन केलेल्या तज्ज्ञांकडून त्याची मांडणी योग्य झाले आहे का याबाबत प्रत्याभरण घेण्यात आले याप्रमाणे संशोधकांनी दररोज एक तास अध्यापन केले.

### 1.7 संशोधनाची सांख्यिकीय साधने

सदर संशोधनासाठी वापरलेल्या साधनांच्या साह्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषणव अर्थ निर्वाचन करून निष्कर्ष काढण्यासाठी विविध प्रकारच्या सारण्या, आलेख, मध्यांक, 't' टेस्ट,प्रमाण विचलन व शेकडेवारी या साधनांचा वापर केला व त्यावरून निष्कर्ष व अर्थनिर्वचन केले.

### 1.8 माहितीचे अर्थनिर्वचन आणि निष्कर्ष

| | | |
|---|---|---|
| Mean | **M1(Pre-Test)** | **M2 (Post-Test)** |
| | 19.33 | 35.26 |
| Standard Deviation | SD1 (Pre-Test) | SD2 (Post-Test) |
| | 4.82 | 2.08 |

#### निरीक्षण

वरील माहितीवरून असे दिसून येते की अंतिम चाचणीचा माध्य (Mean) M1-35.26 हा पूर्वचाचणी माध्य (Mean) पेक्षा M2=19.33 जास्त आहे. गुणांचे समतोल विभाजन या निकषांचा विचार करता पूर्व चाचणी व अंतिम चाचणी यांच्या प्रमाण विचलनात दिसणारा फरक लक्षणीय आहे. याचाच अर्थ असा की अग्रत संघटक प्रतिमांचा उपयोग शालेय व्यवस्थापनातील व्यवस्थापनाच्या उपपत्ती शिकवण्यासाठी केल्यास विद्यार्थ्यांमध्ये धनात्मक वृद्धी होते. संशोधकाने निष्कर्ष काढण्यासाठी 't' टेस्ट चा वापर केला. 'T' मूल्य =34.00 स्वाधीनता मात्रा (df)=29 D सारणी वरून F=29 साठी 0.01 स्तरावरील 't' ची किंमत 2.76 आहे. 0.05 स्तरावरील 't' ची किमंत 2.04 आहे. प्राप्त t ची किमंत ही निर्धारित t मूल्यापेक्षा अधिक म्हणजे 34.00 आहे म्हणून ती 0.01 स्तरावर व 0.05 स्तरावर लक्षणीय आहे.त्यामुळे शून्य परिकल्पना फेटालावी लागेल व परस्पर पर्यायी संशोधन परिकल्पना स्वीकारावी लागेल

### 1.9 निष्कर्ष

शालेय व्यवस्थापन विषयातील व्यवस्थापन उपपत्ती या घटकाच्या अध्यापन संदर्भात अग्रत संघटक प्रतिमानाच्या पायऱ्यांच्या साह्याने केलेले अध्यापन व त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांमध्ये झालेली धनात्मक वृद्धी यांचा परस्परसंबंध आहे.

#### अ) विद्यार्थी शिक्षकांना दिलेल्या प्रश्नावलीवरून प्राप्त झालेले निष्कर्ष

1. विद्यार्थी शिक्षकांना शालेय व्यवस्थापन या विषयांमध्ये कमी गुण मिळतात.
2. शालेय व्यवस्थापनाची सिद्धांत विद्यार्थ्यांच्या लक्षात राहत नाहीत.
3. व्यवस्थापन उपपत्तीचे अर्थपूर्ण अध्यापन होत नाही.
4. विद्यार्थी शिक्षक शालेय व्यवस्थापन विषयातील व्यवस्थापनाच्या उपपत्तीचा अभ्यास करताना पाठांतरावर भर देतात.
5. शालेय व्यवस्थापन विषयातील व्यवस्थापनाच्या उपपत्तीचे नीट आकलन होत नाही.
6. शालेय व्यवस्थापनामध्ये व्यवस्थापन उपपत्ती अध्यापन करताना शैक्षणिक साधनांचा योग्य वापर केला जात नाही.

#### ब) प्राध्यापकांना दिलेल्या प्रश्नावली प्राप्त झालेले निष्कर्ष

1. शालेय व्यवस्थापन विषयातील व्यवस्थापनाच्या उपपत्ती विद्यार्थी-शिक्षक व्यवस्थित समजून न घेता फक्त पाठांतर करतात.
2. शालेय व्यवस्थापनाच्या उपपत्ती या घटकाचे अध्यापन करताना पारंपारिक अध्यापन पद्धती उपयुक्त ठरत नाही.
3. शालेय व्यवस्थापनाच्या उपपत्ती यांचे अध्यापन करताना शिक्षकांना अध्यापनाच्या आधुनिक पद्धती माहिती नाहीत.

#### क) प्रायोगिक संशोधनातून प्राप्त झालेले निष्कर्ष

1. शालेय व्यवस्थापन या विषयातील व्यवस्थापनाच्या उपपत्ती हा घटक शिकवण्यासाठी अग्रत संघटक हे प्रतिमान अत्यंत उपयुक्त आहे.
2. अध्यापनाची प्रतिमाने ही शालेय व्यवस्थापन हा विषय शिकवण्यासाठी अत्यंत प्रभावी आहेत.
3. विद्यार्थी शिक्षकांची शालेय व्यवस्थापन उपपत्ती चे आकलन होण्यासाठी कृती कार्यक्रमांचे आयोजन परिणामकारक ठरते.
4. शालेय व्यवस्थापन विषयातील व्यवस्थापनाच्या उपपत्ती या घटकाच्या अध्यापनासाठी अग्रत संघटक प्रतिमान व त्यासाठी तयार केले अध्ययन साहित्य उपयुक्त ठरते

#### संदर्भसूची


1. जोशी अनंत, महाले संजीवनी (1999) संशोधन अहवालाचे लेखन पद्धती, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
2. देशपांडे व महाले संजीवनी (2008), अध्यापन आणि अध्यापक शिक्षण संशोधनाच्या दिशा, नाशिक: शिक्षण-प्रशिक्षण प्रकाशन.
3. फडके वासंती, (1998), अध्यापनाची प्रतिमाने, पुणे: नूतन प्रकाशन.
4. मुळे, उमाटे वि.तु. (1980) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.
5. सप्रे नीलिमा, पाटील प्रीती, (2002) अध्यापनाची प्रतिमाने, कोल्हापूर: फडके